ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान

* डॉ. बाळासाहेब संपतराव मुळीक,

* सहाय्यक प्राध्यापक , तत्त्वज्ञान विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर – ४१३१०१

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताची जडणघडण खऱ्या अर्थाने भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज राजवटीत भारतीय लोकांचे आर्थिक आणि सांस्कृतिक शोषण सुरू होते. या शोषणाच्या विरोधात भारतात एक स्वातंत्र्यप्राप्तीचा विचारप्रवाह रूजला त्यास साथ आणि सहकार्य म्हणून देशामध्ये अनेक उठाव व क्रांती निर्माण करण्याचे काम महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली झाले. सुमारे शतकभराच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि विविध संघर्षानंतर भारताने आपले राजकीय स्वातंत्र्य मिळविले. या कालखंडात जे राजकीय, आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक व वैचारिक परिवर्तन घडत गेले त्यातून आजच्या भारताची उभारणी झाली. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे स्वरूप लक्षात घेता केवळ राजकीय मूल्यांचा उदय झाला असे नाही तर नव्या आर्थिक, सामाजिक, वैचारिक व शास्त्रीय मूल्यांचा परिपोष होत गेला. यामध्ये आपल्या देशातील स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, क्रांतीकारक आणि सामान्य जनता या सर्वांचे योगदान मोलाचे आहे हे मान्य करावे लागते. भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होताना आपणास आनंद होतो आहे तशीच ही अभिमानास्पद गोष्ट आहे. कारण स्वातंत्र्यानंतरचा भारत कसा असावा याचे सुंदर स्वप्न भारतीयांनी रंगविले होते. यामध्ये सामान्य भारतीयांना स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बंधुत्व, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, बुध्दीवाद आदि मूल्ये व तत्वाधिष्ठित समाज निर्माण व्हावा त्या समाजाचे जीवन सुखी व समाधानी व्हावे या सर्व गोष्टींचा विचार केला गेला तसेच त्या दिशेने आपण पावले टाकीत आहोत. परंतु या सर्व गोष्टींची प्रतीपूर्ती आजही झालेली आहे का? भारतीय स्वातंत्र्याचा ७५ वर्षाचा कालखंड हा अतिशय महत्त्वाचा आहे या काळात अनेक स्थित्यंतरे झाल्याचे दिसते.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री :**

प्राचीन काळापासून भारतीय स्त्री शोषित व अन्यायग्रस्त आहे. आपल्याकडे राक्षसी वृत्तीचा नाश करण्यासाठी दुर्गा, काली व चंडी या देवता स्त्री रूपाने आहेत असे मानले जाते. त्याचप्रमाणे वेदकाळात गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी, सुलभा या स्त्रिया ब्रह्मवादिनी होत्या. इतिहास काळात जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई, चांदबिबी, राणी लक्ष्मीबाई इ. राजघराण्यातील स्त्रियांनी लढा दिला. मध्ययुगीन काळात मुक्ताबाई, जनाबाई, विठाबाई, कान्होपात्रा इ. संत स्त्रियांनी अभंग रचनेतून स्त्रिच्या आध्यात्मिक मुक्तीची कल्पना मांडली. मनुवादी विचारसरणीच्या प्राबल्यामुळे येथील स्त्री दुर्बल, परावलंबी व अज्ञान-अंधकारात पिचलेली होती. धर्माने स्त्रिला धार्मिक

रितिरिवाज कोणतीही क्रियाशील भूमिका दिली नाही. उलट वृतवैकल्याचे ओझे पापपुण्याशी जोडून शारीरिक कष्ट व उपवास तिच्यावर लादले. नवऱ्याच्या मृत्यूनंतर सती जाणे, बालविवाह, विवाहपूर्व मातृत्व, जरठ कुमारी विवाह, विधवांचे केशवपन, स्त्री भ्रुण हत्या, शिक्षणाचा अभाव हे सर्व भारतीय स्त्रियांचे भोग होते. भारतातील मुस्लीम, दलित, आदिवासी आणि भटक्या विमुक्त जातीतील दु:ख यापेक्षा अधिक भयावह आहे. मुस्लिम धर्मीयांतील तलाखपिडीत स्त्री, अन्याय व अत्याचाराला बळी पडणारी स्त्री, अंधश्रध्दा आणि अज्ञानात बुडालेली स्त्री, गावगाडा आणि पोलिसांकडून पिडली जाणारी स्त्री किंवा पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ भटकणारी स्त्री असो अजुनही या स्त्रियांचे दु:ख डोंगरा एवढे आहे. त्यांचा उपेक्षितपणा दूर झाला पाहिजे. यासाठीच समाजसुधारकांच्या चळवळी उभ्या राहिल्या.

मानव जातीच्या इतिहासात स्त्री जातीवर अन्याय व अत्याचार होत आलेला आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रिला जीवनात मुलगी, पत्नी, आई, बहीण, सुन व सासू या वेगवेगळ्या भूमिका निभावाव्या लागतात. यातून तीची समाज सुटका होऊ देत नाही. स्त्रीला लहानपणी वडीलांच्या छायेत तरूणपणी पतीच्या छायेत आणि म्हतारपणी मुलगा व मुलीच्या छायेत आपले आयुष्य घालवावे लागते. पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रिला निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. त्यामुळे तिने वडीलांच्या, पतीच्या व मुलाच्या मर्जीने आपले निर्णय घ्यायचे व संपूर्ण आयुष्य त्यांच्या समवेत काढायचे. तिने स्वत:चे अस्तित्व विसरून पतीची, दिराची, भावजय, स्वत:ची मुले, एकत्र कुटुंबातील दिर-भावजय यांची मुले, सासु, सासरे यांची सेवा-शुश्रुषा करणे हेच एक व्रत समजले. यात तिचे स्वत:चे अस्तित्व हरवले. त्यागाच्या भावनेपोटी संपूर्ण आयुष्य तिचे इतरांसाठी खर्ची पडले. जगातील निम्मी लोकसंख्या स्त्रीयांची असल्याने डोळसपणे आपणास त्यांचे प्रश्न जाणून घेणे आवश्यक वाटते. स्त्रियांची गुलामी आणि स्त्री मुक्ती या संकल्पना समस्या म्हणून समाजासमोर उभ्या राहतात तेंव्हा त्यांची गुलामगिरीतून कशी सुटका होईल याकडे समाजसुधारक व अलीकडील स्त्री मुक्तीच्या चळवळीतील स्त्रिया नेतृत्व करतात व त्यांना न्याय मिळवून देतात. भारतात स्त्री उध्दाराचे काम मोठ्या प्रमाणात पुरूषांकडूनच झाले. भारतात कुटुंबसंस्थेला अनन्यसाधारण महत्व असल्याने विविध नातेसंबंधातून स्त्री विकासाचा मार्ग मोकळा होतो. व्यक्ती स्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्री मुक्तीचा विचार भारतीय परिप्रेक्ष्यात पाश्चात्य विचारांपेक्षा वेगळा करण्याची गरज भासते. शेवटी स्त्री मुक्तीचा विचार स्त्री-स्वातंत्र्य, समानता व आत्मनिर्भरता यांच्या विचारांपाशीच जातो असे म्हणावयास पाहिजे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री :**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात समाजात आमुलाग्र बदल झालेला आहे. यामध्ये प्रामुख्याने शिक्षण आणि स्वातंत्र्य या दोन घटकांचा उल्लेख करावा लागेल. कारण शिक्षण व स्वातंत्र्य या दोन घटकांनी समाजातील अनेक स्तरांमध्ये स्थित्यंतरे घडवून आणली. शिक्षणामुळे भारतातील सामान्य लोकांत, शेतकरी व दलित स्त्रिया यांचे संघटन वाढले व संघटनेने संघर्ष सुरू झाला यातूनच सर्व हक्क व अधिकाराची जाणीव मानसाला निर्माण झाली. समाजातील शोषित, दलित, पिडीत आणि वंचित समाजघटक यांना न्याय मिळू लागला.

समाजसुधारणेची चळवळ इंग्रजी राजवटीच्या काळात सुरू झाली. भारतातील लोकांना इंग्रजी शिक्षणाने नव्या विचार प्रवाहाचा परिचय झाला. त्यातून समतावादी विचाराला गती मिळाली. भारतीय समाजात परमहंस सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राह्मो समाज या संस्थांनी नवी मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा जोतीराव फुले, लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे या समाजसुधारकांनी सतीबंदी, बालजरठविवाह प्रतिबंध, संमती वयाचा कायदा, विधवा पुनर्विवाह, केशवपनाला विरोध स्त्री शिक्षण इ. संदर्भात विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत अनेक वैचारिक व कृतीशील चळवळी उभ्या केल्या. यातुनच स्त्रियांच्या मनाचे परिवर्तन होऊ लागले. स्त्री ही एक प्रकारची मोठी शक्ती आहे. तिची अस्मिता केवळ पुरूषांच्या संदर्भात मर्यादित नाही तीचे स्वातंत्र्य समाजाच्या जडणघडणीसाठी आवश्यक आहे हे महात्मा गांधीनी सांगीतले तेंव्हा स्वातंत्र्य चळवळीसाठी आवाहन केल्यानंतर प्रथमच महात्मा गांधीनी स्त्रियांना मिठाचा सत्याग्रह व सविनय कायदेभंग चळवळ यामध्ये सामील करून घेतले. मोर्चे, लाठीमार, तुरूंगवास अनेक प्रकारच्या हालअपेष्ठा यांना तोंड देण्याचे सामर्थ्य स्त्री मध्ये निर्माण झाले. यातुनच सरोजिनी नायडू व ॲनी बेझंट यांनी राष्ट्रीय चळवळ व होमरूल चळवळीचे नेतृत्व केले. पहिल्या महायुध्दानंतर स्त्रिया नोकरी करू लागल्या नंतरच्या काळात स्त्री शिक्षणाला अधिक चालना मिळाली १९३७ मधील प्रांतिक स्वायत्तता, १९४७ मधील स्वातंत्र्यप्राप्ती, १९५० मधील सार्वभौम प्रजासत्ताकाची स्थापना यामुळे स्त्रियांना घटनात्मक समाज नागरीकत्वाचा दर्जा व सर्व क्षेत्रात समान संधी मिळाली.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्रीला अनेक घटना प्रसंगातून संस्था संघटनातून चळवळी सत्याग्रहातून आपल्या नव्या रूपाची जाणीव होऊ लागली. नोकरी आणि शिक्षणाच्या निमित्ताने स्त्रिला घराबाहेर राहावे लागणे. मैदानी खेळातील महिलांचा सहभाग, नव्या फॅशनमुळे स्त्रियांचा बदललेला पेहराव, ब्युटी पार्लरच्या माध्यमातून स्त्रिचे बदलते रूप, स्त्रियांनी वाहन चालविणे, पोलिस सेवेत रुजू होणे, एकाच संस्थेत मुला-मुलींचे सहयोगी शिक्षण घेणे. दहावी-बारावी परीक्षेत उच्च श्रेणीने उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची लक्षणीय वाढ. इलेट्रॉनिक आणि प्रिंट मिडियाने स्त्रिच्या पारंपरिक रूपाची केलेली मोडतोड, स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला मिळणारी ठळक प्रसिध्दी, स्त्रियांच्या बाजुने झालेले कायदे अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांच्या मानसिकतेत बदल होऊ लागला.

एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या पाहून समाजमनाला खूप वेदना झाल्या. विवाहित स्त्रियांना जाळून मारणाऱ्या घटना, सामुहिक बलात्काराची प्रकरणे, स्त्रियांची वेश्या व्यवसायासाठी होणारी विक्री, स्त्रियांच्या वाढत्या आत्महत्या, अंतर्गत गृहकलहातून स्त्रियांवर होणारे आरोप, सासरच्या लोकांकडून विवाहित स्त्रिचा होणारा छळ, चुल आणि मुल, वंशाला दिवा पाहिजे म्हणून केला जाणारा छळ, घरामध्ये अपत्यांची संख्या जास्त असावी या आणि इतर कारणांमुळे स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर आले. अनेक स्त्री संघटनांनी स्त्रियांच्या प्रश्नावर आंदोलन करून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. याच गोष्टींमुळे भारतात स्त्रिवाद जन्माला आला.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रिवाद संघटनांनी आपल्या हक्कासाठी संघर्ष केला. स्त्रिया घराबाहेर पडून रस्त्यावर आंदोलने करू लागल्या. आपल्या अन्यायाला न्याय मिळावा म्हणून शासन दरबारी उपोषणे, धरणे, आंदोलने, इ. चळवळीत त्यांचा सहभाग वाढला. स्त्री

संघटनांनी आपल्या हक्कासाठी संघर्ष सुरू केला. स्त्रियांना अधिकार मिळावेत म्हणून तशा प्रकाराच्या भूमिका मांडल्या त्यामुळे समाजात उदारमतवादी वातावरण निर्माण होऊ लागले. स्वाभाविकच स्त्रियांच्या पारंपारिक मानसिकतेत मोठा बदल होऊ लागला आणि त्याचे पर्यवसान लेखणी स्वरूपात उमटू लागले.

स्त्रियांना समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि स्वातंत्र्य मिळणे ही स्त्रिवादी चळवळीची मुख्य भूमिका आहे. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रिला वागविले पाहिजे. केवळ ती स्त्री आहे म्हणून डावलेले जावू नये. तिला रोजगाराच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. टेलिफोन ऑपरेटर, रिसेप्शीनिस्ट, नर्स, असिस्टंट, स्टेनो आणि सेक्रेटरी या कामासाठीच विशेष करून सुंदर दिसणाऱ्या स्त्रियांची निवड केली जाते. परंतु तिला जर संधी दिली तर ती आपल्या कर्तुत्वाचा ठसा इतर क्षेत्रातही उमटवू शकते. तिला अधिकाराच्या जागा मिळाल्या पाहिजेत, तिला समान वेतन मिळाले पाहिजे. म्हणूनच व्हर्जिनिया वुल्फ म्हणते स्त्रियांनी लिहिले पाहिजे. त्यांचा आवाज इतरांना ऐकू गेला पाहिजे. त्यांच्या अबोध मनाचा प्रचंड खजिना खुला झाला तर तो सर्वांना दिपवून टाकेल. खरे तर १९७० नंतर पाश्चात्य देशांमध्ये अमेरिकेत स्त्रिवादावर लिहिले गेले. आपल्याकडे मराठीत स्त्रिवादावर फार कमी लेखन झालेले आहे. पाश्चिमात्य स्त्रिला आपल्या हक्कासाठी खुप लढे द्यावे लागले. मताचा अधिकार मिळावा, मालमत्तेत वारसा मिळावा म्हणून तिथे चळवळी केल्या. आपल्याकडे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय घटनेने सर्वांना कायद्यापुढे समान लेखले आणि 'एक माणूस एक मूल्य' असे तत्व घोषित केले. त्यामुळे भारतात स्त्रिवादी लेखन व्यक्त झालेले दिसत नाही असे म्हटले जाते.

भारतात कायद्याने स्त्रिला संरक्षण दिलेले असले तरी आजही स्त्रियांच्या पूर्वी ज्या समस्या होत्या त्याच समस्या नसल्या तरी दुसऱ्या अंगाने त्याचे स्वरूप भयानक आहे. विवाहितेचा हुंड्यासाठी छळ होतच आहे. नवीन सून स्टोव्हच्या/गॅसच्या भडक्याने मरण पावतेच आहे. नवविवाहितेचा पाय घसरून विहिरीत मृत्यू होत आहे. गळफास घेणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी नाही. दैनिक सकाळ दि. २९ नोव्हेंबर २०२२ सोलापूर जिल्ह्यात १ जानेवारी ते ३० ऑक्टोबर दरम्यान तब्बल १ हजार २० विवाहितांनी सासरच्या अन्यायाविरूद्ध पोलिसात धाव घेतली आहे अशी बातमी आहे. केवळ दहा महिन्यातील एका जिल्ह्यातील अधिकृतपणे नोंद झालेल्या घटनांचे एवढे प्रमाण असेल तर देशात स्त्रियांच्या बाबतीत काय परिस्थिती असेल?

**आधुनिक काळातील स्त्री :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक चळवळी उदयास आल्या त्यामध्ये १९६० नंतर स्त्रियांची चळवळ हळूहळू संघटीत होऊ लागली. सन १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकात खऱ्या अर्थाने स्त्रिवादी चळवळीचा पाया रोवला गेला. स्त्रिवादी चळवळीमध्ये स्त्रिला एक व्यक्ती म्हणून पुरूषांच्या बरोबरीने समान स्तरावर वागणूक दिली पाहिजे. स्त्रिला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असायला हवे, आपल्या शरीरावर आपला स्वत:चा अधिकार असावा अशा प्रकारचे विचार मांडण्यात आले. स्त्रिवादी चळवळीतून काही महत्वाच्या घटना स्त्रियांच्या बाजूने घडल्या त्याचे स्वागत करायला हवे. सन १९६० मध्ये महिला परिषदेमध्ये महिलांचे विवाहविषयक खटले हे महिला न्यायाधिशांपुढे चालविण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली. १९६५ मध्ये

लग्न झाल्यानंतर नोकरीतून काढून टाकण्यात येणाऱ्या प्रथेविरूध्द औषध उद्योगातील महिला कामगारांनी संप केला. सन १९६६ मध्ये महाराष्ट्रातील मुस्लिम स्त्रियांनी समान नागरी कायद्याची मागणी केली. सन १९७० मध्ये महिला हक्क संरक्षण कायद्यासाठी समाजवादी महिला संघटनेने जनजागरण सुरू केले. १९७१ मध्ये 'भारतातील स्त्रियांचे समाजातील स्थान' समजावून घेण्यासाठी भारत सरकारने अभ्यास गटाची स्थापना केली. सन १९७५ मध्ये मेक्सिकोमध्ये आंतरराष्ट्रीय महिला परिषद झाली त्याच वर्षी स्त्री मुक्ती संघटनेची स्थापना झाली. सन १९८० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'मथुरा निकालामुळे' देशभर बलात्काराच्या विरोधात लोकमत जागृत झाले. स्त्रियांची विटंबना करणारी नाटके बंद पाडण्यात येऊ लागली. स्त्रियांच्या देह प्रदर्शनाला विरोध होऊ लागला. सन १९८४ साली बलात्कारविरोधी नवीन कायदा अस्तित्वात आला. सन १९८६ साली स्त्रियांच्या अश्लिल आणि बिभित्स देह प्रदर्शनाला विरोध करणारा अश्लिलविषयक कायदा अस्तित्वात आला. सन १९९० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या.

आजही भारतामध्ये स्त्री समानता हा विषय केवळ गप्पांपूरता व कागदांवर असल्याचे बऱ्याचदा दिसते. प्रत्यक्षात पुरूषसत्ताक कुटुंबप्रणालीत स्त्रियांना स्वातंत्र्य दिले जात नाही. कुटूंबव्यवस्था हे भारताचे बलस्थान असले तरी ते विघटनाच्या दिशेने पाऊल टाकत असताना दिसते तेंव्हा भारतातील जवळजवळ सर्वच क्षेत्रात सामाजिक जीवनामध्ये कमालीचे औदासिन्य, अनैतिकता, भ्रष्टाचार वाढलेला आहे. घटस्फोट, कौटुंबिक कलह यास स्त्रिला जबाबदार धरले जाते. तेंव्हा आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीचे अवलोकन करावयास हवे. आपल्या संस्कृतीमध्ये जे काही चांगले पवित्र व उदात्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागामुळे साध्य झालेले आहे हे विसरता कामा नये. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनीच केली आहे. कुटुंब व्यवस्था टिकविण्यासाठी स्त्रियांनी खूप मोठा त्याग केलेला दिसतो. जेवढ्या प्रमाणात स्त्रिया सुशिक्षित होतील तेवढ्याच प्रमाणात आपणास आर्थिक स्वायत्तता मिळेल. महात्मा फुले यांचे मते सुशिक्षित स्त्रिया अन्यायाचे जोखड फेकून देतील, अन्यायाला जाब विचारतील. जेथे शोषण होईल तेथे उठाव करतील. कारण अन्याय करणारा हा पुरुषच आहे. तेंव्हा शोषीत, पिडीत व अन्यायाचा उठाव करताना स्त्रियांना साथ द्यावी व पुरुषांनी स्त्रियांच्या चळवळीत सहभागी व्हावे.

विवाह संस्थेमुळे स्त्रियांचे होणारे शोषण आणि समाजातील तिचे दुय्यम स्थान ह्याविषयी समाजमनात हालचाल सुरू झाली. पुरूषांनी स्त्री चे गोडवे गाणाऱ्या तथाकथीत उदात्त प्रतिमा निर्माण केल्या होत्या. देवता, सती, प्रतिव्रता, माता, अबला, अर्धांगीनी, सौभाग्यवती अशा तथाकथीत रूपांना तडे जाऊ लागले. जोडीदार, मैत्रीण, सहकारी आणि कार्यकर्ती अशा नव्या रूपात जीवनाच्या अनेक क्षेत्रात स्त्री पुढे येऊ लागली. तीने अर्धांगणी होण्यापेक्षा पुर्णांगी होणे पसंत केले. चूल आणि मुल हे तिचे कार्यक्षेत्र मागे पडले आणि तिचे पारंपारिक रुपसुध्दा बदलले. स्त्री मुक्ती चळवळीमुळे स्त्रियांमध्ये नवी चेतना, प्रेरणा निर्माण झाली.

संपूर्ण समाज समानतेच्या विचाराने चालत असेल तर स्त्री व पुरूष हा भेदभाव मनातून नाहिसा होईल. आज आणि उद्या पुरुषाची पावले जशी पडतात तशीच स्त्रीयांचीही पावले पुरुषांच्या बरोबरीने पडायला पाहिजेत. केवळ कायदे, नियम करून चालणार नाही

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

त्याची प्रत्यक्षात प्रत्येक कुटूंबात समानतेच्या, हक्काच्या आणि कर्तव्याच्या दृष्टीकोनातून अंमलबजावनी झाली पाहिजे. याचसाठी पुरुष मंडळीचे मनपरिवर्तन महत्वाचे आहे. आज एकटी स्त्री निर्भयपणे फिरु शकत नाही. पसंतीचे कपडे घालू शकत नाही. निर्णय क्षमतेत तिचा विचार केला जात नाही. तिला दुय्यम स्थान देताना आपल्या प्रगतीचे पंख आपणच छाटत आहोत याची जाणीव आपणास नसते. स्त्रिवर पुरूषांचा कोणत्याही गोष्टीवर विश्वास असायला पाहिजे. जर स्त्री लिहिती झाली तर स्वत:चे दु:ख कथा, कादंबरी, नाटक, लेखाद्वारे व्यक्त होईल. स्त्रियांना आजही व्यक्त होण्याचे मार्ग कमी आहेत. स्वत:च्या पतीबरोबरही ती व्यक्त होऊ शकत नसेल तर स्त्रियांच्या कर्तुत्वाच्याबाबतीत अंदाज येणार नाही. त्यांना दु:ख सांगण्याच्या जागा पुरुषांनी निर्माण करायला हव्यात. शेवटी स्त्रियांच्या कार्यकर्तुत्वाचा परिघ पुरुषांनीच व्यापक करावा. मग स्त्री शक्ती कोठेच कमी पडणार नाही. स्त्री शक्तीचा उद्यापासून समानतेचा प्रवास सुरू झाला तरी भारतामध्ये पुरूषांचे मनपरिवर्तन व्हायला खूप वर्ष लागतील पण स्त्रियांच्या बाबतीत आशादायक चित्र हे भारतात नक्की पाहायला मिळेल असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ**:

➢ अश्विनी धोंगडे, स्त्रिवादी समीक्षा: स्वरूप आणि उपाययोजना.

➢ प्रा. नागोराव कुंभार, संपादक, विचारशलाखा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विशेषांक

➢ एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२.

➢ वि. का. राजवाडे, भारतीय विवाहसंस्थेच इतिहास.

➢ ॲड. भास्करराव आव्हाड, महाराष्ट्र टाइम्स, भारतीय स्त्रीचे योगदान, ७ जून २०१९.

**Cite This Article:**

***डॉ. बाळासाहेब संपतराव मुळीक,*** *(2022)* भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 172-177.*